
पु. पाँ. गोखले



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

पु. पां. गोखले

इंद्रायणी साहित्य, पुणे ३०

* प्रकाशक :
श्याम दयार्णव कोपर्डेकर,
इंद्रायणी साहित्य,
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

* मुद्रक :
दामोदर अनंत घळसासी,
वृंदा प्रिंटर्स
६३५ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

* प्रकाशन दिनांक
१५ ऑगस्ट १९८१

* © पु. मा. गोखले

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## संन्याशाचा आशीर्वाद

मालोजीराव संगपाळांचे चिरंजीव आनंदराव. थोरला मुलगा पण अगदीच अबोल, इतर मुलाबरोबर खेळणे, बागडणे त्याला आवडायचे नाही. कसल्यातरी चिंतनात तो सदैव असायचा. त्यामुळे भावंडे व गावची मुले त्याला साधू म्हणत. तो कोणाच्या अध्यात ना मध्यात ! तो पुढे संन्यासीही झाला.

रामजी मालोजी संगपाळ रावळपिंडीला असतानाची १८७९ तील गोष्ट. लष्करी छावणीशेजारून नदी वाहात होती. नदीच्या काठी झाडांच्या गर्द छायेत साधुसंन्याशांचा एक तळ पडला होता. नदीच्या पाणवठ्यावर धुणी धुण्यासाठी भीमाबाई संगपाळ आपल्या इतर शेजारणींबरोबर आल्या होत्या. संन्याशांपैकी एक म्हातारा भीमाबाईकडे टक लावून पाहात होता. तेव्हा बायकामंडळी सहजच कावरीबावरी झाली. धुण्याचे गाठोडे घेऊन भीमाबाई घाटाच्या पायऱ्या चढून घरी जाऊ लागल्या. तेव्हा तो म्हातारा संन्याशी त्यांच्यापुढे आला. म्हणाला– " भीमा मला तू ओळखले नाहीस ? अगे, मी तुझा दीर आनंद. '

त्यासरशी भीमाबाईनी खाकेतले धुणे आणि डोईवरची घागर खाली ठेवली आणि त्या संन्याशाला नमस्कार केला.

" तुझ्या पोटी महातेजस्वी पुत्र येईल. "

हा आशीर्वाद घेऊन भीमाबाई घरी गेल्या व रामजीना सर्व

हकीकत सांगून त्यांनी नदीकडे त्यांना धाडले. रामजी आपल्या बंधूना कडकडून भेटले आणि डोळ्यातील गंगायमुनांनी एक-मेकांचे खांदे न्हाऊन निघाले.

पुढे महूच्या लष्करी छावणीत असता संन्याशाचा आशीर्वाद खरा ठरला. भीमराव (संगपाळ ऊर्फ आंबेडकर) १४ एप्रिल १८९२ रोजी जन्मास आले ते आशीर्वादाच्या तपानंतर.

## रामजींना भीम झाला

रत्नागिरी हा महाराष्ट्राचा एक जिल्हा. त्यात खेड हा एक तालुका. त्यात आंबवडे हे एक खेडे. तेथे रामजी मालोजी संगपाळ एक वतनदार.

संगपाळांच्या घराण्यात पूर्वापार सरदारी बाणा. लढाईचे क्षेत्रच त्याना अधिक आवडे. मालोजीराव संगपाळ यांची हयात ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करातच गेली. लष्करात ते हवालदाराच्या हुद्द्यापर्यंत चढले.

मालोजीरावांना चार मुले. सर्वांत धाकटे चिरंजीव रामजी. त्यांना मालोजीरावांनी नॉर्मल स्कूलमध्ये घातले. लष्करातील नोकरांच्या मुलांना तेथेच शिक्षण मिळे. शिक्षण चालू असतानाच '१०६ सॅपर्स आणि मायनर्स' या कंपनीत रामजींनी नोकरी धरली. नॉर्मल स्कूलची शेवटची परीक्षा रामजी पास झाले. इतिहास, गणित व इंग्रजीत ते प्रगत होते. ज्योतिष व हस्तसामुद्रिक यांचाही रामजींना नाद होता. त्यामुळे ते नोकरीत व नोकरीनंतरही लोकप्रिय होते. आपल्या मोकळ्या वेळात ते ज्ञानेश्वरी, तुकोबाची गाथा, एकनाथी भागवत, चोखोबांचे व नाम-

देवांचे अभंग वाचत. १८७८ मध्ये हिंदुस्थान-अफगाणिस्थान युद्ध झाले. तीत रामजीच्या पलटणीने नाव कमावले. रामजी सुभेदार झाले. महू येथे नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक म्हणून काम करीत असता १८९२ च्या १४ एप्रिल रोजी रामजींच्या पोटी भीमराव जन्मले. तेच सुप्रसिद्ध डॉ. आंबेडकर होत.

**अडणूक-अडवणूक अनुभवास झाली**

रामजी संगपाळ १८९४ त सेवानिवृत्त झाले. कांही दिवस दापोली (जि. रत्नागिरी) येथे राहिल्यावर सातारा येथील पी. डब्ल्यू. डी. च्या ऑफिसात स्टोअरकीपरची जागा त्याना मिळाली. १८९६ मध्ये ते सातारला आले.

रामजीनी सातारच्या कँप शाळेत आपला मुलगा भीमराव घातला. भीम शाळेत रमला. शाळेत तो लक्षपूर्वक अभ्यास करी. सर्व शिक्षक त्याच्यावर प्रेम करीत. शाळेतील खेळगड्यांचाही तो लाडका होता. कँप शाळेत चार वर्षे शिकल्यावर १९०० साली भीमराव सातारा हायस्कूलचा विद्यार्थी झाला.

हायस्कुलात आल्यावर भीमरावांचा मित्रपरिवार वाढला. शाळेत त्याला या मित्रपरिवारांपासून लांब बसावे लागे. पण मोकळ्या वेळात सगळी मुले एकत्र हुंदड्या मारीत. पाणी प्याव-याचे तर ते तांब्यातून कोणीतरी ओतावयाचे व खाली स्वतःच्या ओंजळीने भीमराव आणि मंडळीनी प्यावयाचे. याला अपवाद काय तो आंबेडकर गुरुजींचा. ते भीमरावला मुलासारखाच जवळ करीत.

## आंबवडेकर, नव्हे आंबेडकर

इंग्रजी दुसरी इयत्ता. त्या वर्गाला आंबेडकर गुरुजी शिकवीत. आपल्या वर्गातील भीमराव रामजी या विद्यार्थ्याबद्दल त्यांना आपुलकीच आपुलकी. रोज मधल्या सुट्टीत गुरुजी भीमाला आपल्या शिदोरीपैकी थोडी फार देत.

एकदा काय झाले; भीमरावाची शिदोरी खाऊन झाली. आंबेडकर गुरुजींनी भीमरावला बोलावले. विचारले–' बाळ भीम, तुम्ही मूळचे कोठचे ?'

उत्तर आले, ' रत्नागिरी जिल्ह्यातील. मंडणगडापासून पाच मैलावर आमचे गाव. आंबवडे त्याचे नाव. तिथेच माझा जन्म झाला. १४ एप्रिल १८९२ ही माझी जन्मतारीख.'

' अरे वा !' गुरुजी आनंदाने बेहोषले. ' रत्नागिरी जिल्ह्यातला तुझा जन्म. लो. टिळक, डॉ. भांडारकर त्याच जिल्ह्यात जन्मले. नररत्नांच्या खाणीतीलच तू ! तूही लौकिकास चढशील हं ! पण गड्या, आंबवडेकर हें तुझे आडनाव मला जरा खटकते रे ! त्याऐवजी आंबेडकर म्हटले तर ? आडनावातील बोजडपणा तरी जाईल !'

' पण सर, हे का माझ्या हातात आहे ?'

गुरुजी म्हणाले–' तुझ्या नसले तरी माझ्या हातात आहे. फक्त तुझी संमती हवी. तुझ्या वडिलांनी तुझे नाव भीम ठेवले. विद्यादाता गुरू हादेखील वडिलांसारखाच असतो. म्हणून मी तुला आंबेडकर हे आडनाव देतो. आंबवडेकराचे आंबेडकर हे कोणी अपभ्रष्ट रूप म्हणतील ! म्हणेनात का ! नवी रीत घालून देणारांनी लोक काय म्हणतात याची पर्वा कशाला करायची ?'

झाले! तेव्हापासून भीमराव आंबेडकर झाले. नावात काय आहे? अहो, भीमरावाने आपल्या गुरुजींच्या मनी आपल्याबद्दल केवढा जिव्हाळा निर्माण केला होता! आडनावाच्या बदलात तो जिव्हाळा आहे. केशवसुतांनी म्हटले आहे—'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे!'

## एल्फिन्स्टन् हायस्कुलात

रामजींची नोकरी १९०४ मध्ये संपली. मग ते मुंबईस परळला राहण्यास गेले. तर्खडकरांची तीन भाषांतरे, हॉवर्डचे रीडर, यांनी भीमरावांचे इंग्रेजी फर्मास झाले, ना. गोखल्यांचे गणित मोठे होते तरी भीमरावांनी ते चांगलेच हाताळले. पर्शियन भाषा तर हातखंडा. त्यामुळे सर्व शिक्षक खूष. खोदाबक्ष बेहरामजी इराणी यांची तर बेहद्द मर्जी!

क्रिकेट, हॉकी, फूटबॉल या खेळातही भीमराव प्रवीण.

भीमरावांची प्रगती चालू होती. त्यांनी लोकांचेही लक्ष वेधून घेतले होते. भीमराव चौदा वर्षांचेच असताना त्यांचे दोन हातांचे चार हात झाले. दापोलीचे वलंगकर भिकोबा यांची नऊ वर्षांची कन्या सांगून आली होती. रमाबाई तिचे नाव. ती भीमरावांची गृहलक्ष्मी झाली.

भीमराव १९०७ साली मॅट्रिक झाले. रामजींचा आनंद गगनात मावेना. १९०८ च्या जानेवारीत भीमरावाचा जाहीर सत्कार झाला. सर्व जातींचे स्त्रीपुरुष सत्कारास हजर होते. अध्यक्ष होते सीताराम केशव बोले. इतिहासकार कृष्णाजी अर्जुन केळुसकर

त्या सभेत भीमरावाच्या तन्मय होऊन वाचण्याच्या संवयीबद्दल खूपच स्तुतिपर बोलले.

लग्न झालेला महाराचा पोर मॅट्रिक झाला, हा सर्व समाजात त्यावेळी आगळाच आनंद होता.

केळुसकरांनी त्यावेळी मुंबईत मुक्कामास असलेल्या श्रीमंत सयाजीराव गायकवाडांकडे भीमरावास नेले. बडोदा-महाराज भीमरावाला पाहून व त्याची कर्तबगारी ऐकून एवढे खूष झाले की त्यांनी दरमहा पंचवीस रुपयांची शिष्यवृत्ती भीमरावांना बहाल केली.

## भीमराव पदवीधर झाले

भीमराव आंबेडकरांनी १९०८ च्या जानेवारीत एल्फिन्स्टन् कॉलेजात नाव घातले. प्राध्यापक इराणी यांची खोली त्यांना अभ्यासासाठी मिळाली. वडील रामजी खाण्यापिण्याच्या, कपडालत्त्यांच्या, फी-पुस्तकांच्या बाबत कसलीही वाण आपल्या मुलास पडू नये, म्हणून रात्ररात्र जागत. आपल्या मुलाने विद्येत नाव काढावे म्हणून. रामजी अभ्यास करण्याबद्दल, भीमरावांच्या मागे लकडा लावीत. त्यासंबंधी आंबेडकरच सांगतात की—

"आमच्या वडिलांची घरची शिस्त कडक व फौजी असल्यामुळे, मला त्यांच्या कडकपणाचा फार कंटाळा येई. आता मला वाईट वाटते की माझ्या वडिलांच्या तळमळीप्रमाणे मी अभ्यास केला असता, तर मुंबई विश्वविद्यालयाच्या एकूण एक परीक्षा दुसऱ्या वर्गात पास होणे मला अशक्य नव्हते. पण त्यावेळी मला त्यांच्या तळमळीचा अर्थ कळत नसे.' (नवयुग १९४७ विशेषांक).

सन १९१३ त भीमराव पदवीधर झाले. रामजींना गगन ठेंगणे झाले. आता आपण मिळवते झाले पाहिजे, ही जाणीव भीमरावास झाली. त्यांनी कृतज्ञतेने बडोद्यास नौकरीसाठी अर्ज केला. त्यांना ताबडतोब बोलावणे झाले.

**प्रतिज्ञा**

नागपूरात अखिल भारतीय बहिष्कृत परिषद १९२० साली प्रथमच भरली. तारीख होती ३० व ३१ मे आणि १ जून. या अध्यक्ष होते कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या परिषदेत सिंहगर्जना केली— अस्पृश्योद्धार करूनच मरेन.

**सरस्वती प्रसन्न**

भीमरावांची नेमणूक बडोद्याच्या मुख्य कचेरीत झाली. पण तेथे त्यांचा महार म्हणून उपहास होऊ लागला. साधे पट्टेवाले सुद्धा कामाच्या फायली दुरून फेकीत. पंडित आत्माराम नावाच्या एका आर्यसमाजीने समाजमंदिरात आंबेडकरांची राहण्याची सोय मात्र केली. महाराजांच्या कानावर सर्व हकीकत घालावयाची, तर त्यांची भेट काय वाटेवर पडली होती? एक आठवडा सरासरी गेला. मुंबईहून तार आली. वडील आजारीच आजारी! ताबडतोब निघून या! त्या तारेसरशी भीमराव आंबेडकर वडिलांच्या भेटीस गेले. बाप-लेकांची कळवळयाने भेट झाली. पण देवाघरचे बोलावणे कोणाला चुकले? २ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजी देवाघरी गेले. भीमरावांच्या

दुःखाला पारावार नव्हता!

मलबार हिलवर श्रीमंत सयाजीराव होते. आंबेडकर जाऊन त्यांना भेटले. बडोद्याचा अनुभव सांगायचा! पण त्या अगोदरच महाराज म्हणाले– 'अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात मी काही विद्यार्थी पाठवावे म्हणतोय! तुमचे नाव महर्षी शिंद्यांनी सुचविले आहे. तुमची काय मर्जी आहे?'

भीमरावांनी होकार दिला. तेथे समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि राजकारण मी शिकेन असेही त्यांनी सांगितले. दुसरे दिवशी बडोदा विद्याखात्याकडे अर्ज गेला. बडोद्याहून बोलावणे आले. आंबेडकरांनी बडोद्याला जाऊन करार लिहून दिला व शिष्य-वृत्तीच्या तीन महिन्यांचे पैसे घेतले. मुंबईस परत आल्यावर घरची व्यवस्था लावून जून १९१३ मध्ये आंबेडकरांनी हिंदुस्था-नचा किनारा सोडला.

जुलै २० रोजी आंबेडकर न्यूयॉर्कला पोहोचले. सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या सत्राला बसण्यास त्यांना परवानगी मिळाली. विद्यापीठाच्या हार्टले हॉलमध्ये राहण्याची सोय झाली. तेथे सर्व मुक्तद्वार होते त्यामुळे भीमरावांना किती शिकू व कसे शिकू असे होऊन गेले. रात्रीचा दिवस करून ते तासच्या तास अभ्यास करत. प्रमुख विषयांच्या अनुषंगाने येणाऱ्या इतिहास, काव्य, नाट्य, छंद, वंशशास्त्र इत्यादी विषयांवरील महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी वाचले. विद्यापीठाचे ग्रंथालय हेच त्यांचे देवघर होते. १९१५ साली ते एम्. ए. व लगेच पीएच्. डी. झाले. 'दि नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया–ए हिस्टॉरिकल अँड अनॅलिटिकल स्टडी' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता.

मग आंबेडकरांनी सयाजीराव महाराजांकडून तीन ऐवजी चार

वर्षांची शिष्यवृत्ती आवर्जून व आर्जवून मिळविली व ते इंग्लंड-मध्ये बॅरिस्टर होण्यासाठी निघाले.

डॉ. आंबेडकरांनी आपली ज्ञानलालसा लंडन नगरीत सन १९१६ साली सुरू केली. त्यांनी इंडिया हाऊसमध्ये मुक्काम ठोकला. लंडन स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स या संस्थेत नाव घातले. तसाच ग्रेज इन् या संस्थेत कायद्याच्या अभ्यासासाठी प्रवेश मिळविला. एम्. एस्. सी. आणि बार् अॅट लॉ या दोन्ही परीक्षांची तयारी बरोबरीनेच करीत असल्यामुळे, जिवाचे रान करून भीमरावांनी अभ्यास आटोक्यात आणला.

पण दैवयोग दुर्विपाक झाला. बडोद्याच्या शिष्यवृत्तीची मुदत संपली. त्यांना नोकरीवर हजर राहण्याचा हुकूम आला. लंडन विद्यापीठाने व ग्रेज इन् या संस्थांनी आंबेडकरांना अभ्यास पूर्ण करण्याची मुदत चार वर्षांनी वाढवून दिली. बडोद्यास त्यांची नोकरी सुरू झाली. तसा जिकडे तिकडे नावडत्या सुनेला मिळ-णाऱ्या वागणुकीचा अनुभवही येऊ लागला. यावेळी सावत्र आई आणि थोरले भाऊ आनंदराव मुंबईस आजारले ! म्हणून तात-डीने आंबेडकर तार पोचताच मुंबईस गेले. दोघाही थोरानी जगाचा निरोप घेतला. मग, डॉक्टरांनी बडोद्याची नोकरी सोडली व ते मुंबईच्या सिडनहॅम् कॉलेजात अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले. स्वतःच्या मिळकतीतून संचय केला आणि कोल्हापूरच्या छत्रपती शाहूमहाराजाकडून दीड हजार रुपयांची मदत मिळवून ५ जुलै १९२० रोजी आंबेडकर पुन्हा लंडनला गेले.

**जाते घडी ही अपुली साधा**

बॅरिस्टर होण्यासाठी भीमराव इंग्लंडला गेले. पण पदरी पुरेसा

पैसा नाही, कुणाचे पाठबळ नाही. येऊन जाऊन शिष्यवृत्तीचे मोजके पैसे हातात. तेव्हा ठराविक वेळात साराच्या सारा अभ्यास संपलाच पाहिजे. जबाबदारीच आली ती. म्हणून जे जे ग्रंथ मिळतील ते वाचावयाचेच! पण वर, पोटाला चिमटा घेऊन जरूर ते ग्रंथ खरेदी करावयाचे! भीमरावांनी सपाटाच चालविला तो!

एकच पान का होईना; पण शब्दार्थाने, संदर्भाने व विषयाचा वेध घेऊन जे अभ्यासतात, ते आपले मन मोठे, मोठे, मोठे करीत जातात आणि आपले अन्न अमृततुल्य चाखतात. एवढेच नव्हे, तर असे महामना जेव्हा हजारोंच्या रांगेत बसतात, तेव्हा त्या रांगेली पावनच पावन करून सोडतात. तसा महामना आपण व्हायचेच, असे भीमरावांच्या मनाने घेतले होते. पण त्याला, खायप्यायची काळजी तरी अभ्यासकाला असू नये. तसा योग भीमरावांना होता कोठे? ते एका इंग्लिश बाईच्या घरी राहात होते. त्या बाई चांगल्याच खाष्ट! सकाळी न्याहारीला त्या भीमरावांना फक्त चहा, पावांचा एक तुकडा व त्यावर बोटभर मुरंबा देत. तरी आंबेडकर भीमरावांनी कधी हूं की चूं केले नाही. सर्वांआधी उठून ते लंडनचे म्यूझिअम गाठत. तेथे ते प्रथम घुसावयाचे. दुपारपर्यंत ते वाचनालयात अभ्यास करावयाचे. दुपारी बरोबर आणलेली शिदोरी सोडावयाचे. सँडविचचे तुकडे तोकडेच पण पोटभर पाणी प्यावयाचे.

दिवसाकाठी आठ आठ तास त्यांचे असे ज्ञान मिळविणे चाले. संध्याकाळी टिपणवह्यांनी फुगलेले खिसे घेऊन भीमराव म्यूझियम सोडीत. पुढे तरी झोप कसली? रात्र रात्र त्यांचे वाचन चाले.

भीमरावांचे सहकारी म्हणत, 'आंबेडकर, पुरे करा असला अभ्यास! बृहस्पती का व्हायचे आहे?'

भीमराव उत्तर करीत 'का मी होऊ नये देवगुरू?' जाते

घडी ही अपुली साधा, करा काय ते अता करा !' अशी माझ्या गुरूंची मला शिकवण आहे. तो प्रयत्न पुरुषार्थ मजजवळ आहे. अन्नाला पैसा आणि झोपायला वेळ मला नाही, तर नाही !!'

१९२३ च्या जुलै महिन्यात भीमराव आंबेडकर बॅरिस्टर झाले, ते अशा अभ्यासाने. पुढे ते चमकदार मंडळीमध्ये श्रेष्ठ ठरले, देव-गुरू झाले ते त्या अभ्यासानेच. 'अभ्यासेचि प्रगट व्हावे' हा त्यांचा बाणा होता.

डॉ. आंबेडकर जन्मभर विद्यार्थी आणि शिक्षक होते. आपल्या बुद्धिप्रकाशानें त्यांनी अनेकानेक उद्बोधक ग्रंथ निर्माण केले व जगात विचारप्रवर्तन केले. विद्वान म्हणून त्यांचा गौरव जगातील जाणत्यांकडून सदैव होत राहिला. ५ जून १९५२ ला एका खास पदवीदान समारंभात कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डी. लिट् ही सन्मान-पदवी दिली. विद्यापीठाने 'आंबेडकर हे भारतातील एक प्रमुख नागरिक, मोठे समाज सुधारक आणि विक्रमी मानवी हक्कांचे उद्गाते' असे त्यास गौरविले होते.

## वज्राघात

सन १९२६. जुलै महिना. त्यांचा आवडता पुत्र चिरंजीव राजरत्न या महिन्यात देवाघरी गेला; हा केवढा धक्का होता डॉ. आंबेडकरांना !

त्या वज्राघातात डॉक्टरांना हजारो सांत्वनपर पत्रे आली. पण शब्दांचा सोळभोगपणा अंतःकरण कसे शांत करणार ? भीम-राव आंबेडकरांनी आपले परम मित्र दत्तोपंत पवारांना लिहिले—

'पुत्रनिधनामुळे आम्हा उभयतांस जो धक्का बसला आहे,

त्यातून आम्ही बाहेर पडू, असे म्हणणे ढोंगीपणाचे होईल. आतापर्यंत तीन मुलगे आणि एक मुलगी अशा चार लाडक्या बाळांना मूठमाती देण्याचा प्रसंग आमच्यावर ओढवला. त्याची आठवण झाली की, मन दु:खाने खचते. त्यांच्या भवितव्याविषयी जे मनोरथ आम्ही बांधले होते, ते ढासळले ते वेगळेच! आई-बाप मुलांना जन्म देतात, कर्म देत नाहीत, असे म्हणणे ठीक नाही. आई-बाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात, त्यामुळे मुलांच्या मृत्यूबरोबरच जीवनाला चव आणणारे मीठच नष्ट झाल्यामुळे आमचे जीवन अळणी झाले आहे. बायबलमध्ये म्हटले आहे ना; की–'तुम्ही धरित्रीचे मीठ आहात म्हणून. मिठाची चवच गेली तर त्याला खारटपणा कशाने आणता येईल?' शून्यवत् होऊन पडलेल्या माझ्या जीवनात या वचनाची सत्यता पटते. माझा शेवटचा मुलगा असामान्य होता. त्याच्यासारखा मुलगा मी क्वचितच पाहिला असेल. तो गेल्यावर माझे आयुष्य रानाने माजलेल्या बागेसारखे झाले आहे. दु:खातिशयामुळे पुढे काही लिहवत नाही. दु:खाने खंगलेल्या आपल्या मित्राचा आपणास नमस्कार.'

## राष्ट्रकार्यास सुरुवात

एम्. एस्. सी., डी. एस्. सी. व बार अॅट लॉ या पदव्या सन्मानपूर्वक मिळविण्यात डॉक्टरांनी भयंकर चिकाटी व निर्धार दाखविला. १४ एप्रिल १९२३ रोजी ते मुंबईस परत आले.

या मोठमोठ्या परीक्षा पदरात पाडून घेत असताच हिंदुस्थानातील अस्पृश्यवर्गात नवीन होत असलेल्या क्रांतीकडे आंबेडकर लक्ष पुरवीतच होते. १९१८ साली साऊथबरो कमिटीपुढे त्यांनी

अस्पृश्यांच्या हक्कांची जोरदार मागणी केली. २१ मार्च १९२० रोजी कोल्हापूर प्रांती माणगाव येथे अस्पृश्य परिषद भरली असता, शाहू छत्रपतींनी; 'मूकनायक' या मुंबईच्या साप्ताहिकातून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांची दुःखे जनतेसमोर उघडी केली होती त्याचे कौतुक केले आणि डॉक्टर लवकरच अखिल भारतीय पुढारी होतील असे भविष्य वर्तविले. १९२३ मध्ये आंबेडकर हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांनी मुंबई हायकोर्टाची सनद काढली व हाती घेतलेल्या कामाबद्दल कळकळ, खटल्याचा सांगोपांग अभ्यास, बिनतोड युक्तिबाजपणा या गुणांच्या जोरावर ते लवकरच नाणावलेले बॅरिस्टर ठरले.

मार्च १९२४ मध्ये आंबेडकरांनी मुंबई येथील दामोदर हॉलमध्ये बहिष्कृत-हितकारिणी सभा स्थापन केली. त्यामध्ये व एप्रिलमध्ये बार्शी येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेत अस्पृश्यांनी आपल्या पायावरच उभे राहिले पाहिजे असे ठरविण्यात आले. तेथे ठरल्याप्रमाणे १९२५ साली बार्शी येथे वसतिगृह स्थापन करून स्वावलंबी स्वोद्धाराचा मार्ग यशस्वीपणे सुरू झाला. अस्पृश्यांना ताठ मानेने माणूस म्हणून जगण्याच्या सुविधा मुंबईच्या हॉकी क्लबपासून मिळवून देण्यात आल्या. अन्यत्रही तसेच प्रयत्न झाले.

बहिष्कृत-हितकारिणी सभेमार्फत आंबेडकरांनी मराठी मुलखात दौरा केला. निपाणी, मालवण, गोमांतक भागात जागृती करून जेजुरी डॉक्टरांनी घेतली. कोरेगाव (भीमा) येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या प्रचंड मेळाव्यापुढे आंबेडकरांनी सरकार व स्पृश्यवर्गीय हिंदू या दोन आघाड्यांवर रणशिंग फुंकले. सरकार दरबारातून आणि बाहेर मोर्चे, सभा, निदर्शने करून त्यांनी आपला आवाज दोन्ही दिशांना पोचविला.

मुंबई सरकारने लेजिस्लेटिव कौन्सिलमध्ये आंबेडकरांची निवड केली. विधिमंडळातील जाणत्या लोकांना डॉक्टर आपली बाजू समजावू लागले. डॉक्टरांचा उत्तरोत्तर होत असलेला उत्कर्ष पाहून अस्पृश्यवर्गीय मुंबईतील शिक्षकांनी डॉक्टरांचा १९२७ मध्ये जाहीर सत्कार केला. आंबेडकर कृतज्ञतेने म्हणाले 'आपणा गुरुजनांचा आशीर्वाद मला पुढील कार्यास सहाय्य होईल.'

**चवदार तळ्याचा सत्याग्रह**

अस्पृश्यांच्या हक्काविषयीचा कायदा १९२६ साली सुधारला. त्या अन्वये अस्पृश्यांना सार्वजनिक संस्था, पाणवठे, शाळा, सरकारी कचेऱ्या, इत्यादी ठिकाणी मनमोकळेपणाने वावरण्याचा हक्क मिळाला.

बहिष्कृत-हितकारिणी सभेमार्फत १९ व २० मार्च १९२६ ला मुंबई प्रांतिक अस्पृश्य परिषद महाड येथे झाली. पंढरीच्या यात्रेसारखे लोक जमले. त्यांना डॉ. आंबेडकर म्हणाले, 'मित्रहो, आपण माणसासारखीच माणसे आहोत. हाडामासाने हिंदू असूनही पाणवठ्यावर पाणी मिळू नये ? देवळात जाऊन देवाचे दर्शन करता येऊ नये किंवा सार्वजनिक ठिकाणी दिमाखाने बसता येऊ नये ? त्यासाठी कमरा कसून यत्न करा. आपली राहणी स्वच्छ ठेवा. सरकारच्या ठरावाप्रमाणे आम्ही उद्या येथील चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा हक्क शाबीत करणार आहोत. आपण आमच्या मागे यावयास तयार आहात काय ?'

'होय' असा प्रतिसाद टाळ्यांच्या कडकडाटात आला. दुसऱ्या दिवशी शहरातील प्रमुख रस्त्यातून प्रचंड मिरवणूक निघाली.

डॉ. आंबेडकर अग्रभागी होते. मिरवणूक अत्यंत शिस्तीची होती. सर्वजण चवदार तळ्यावर पोचले. आंबेडकरांचे छोटेसे भाषण झाले. हजारो वर्षांची दुष्ट चाल मोडून आंबेडकर आणि त्यांचे अनुयायी चवदार तळ्याचे पाणी प्याले. सुदबा टिपणीस प्रभृती समजदार स्पृश्य आंबेडकरांचे सहकारी होते.

हा ऐतिहासिक प्रसंग हजारो स्पृश्यांनी पाहिला. सर्वसामान्य माणूस मुकाट्याने घरी परतला. पण सनातनी म्हणविणाऱ्यांचे डोके भडकले. महारांनी आपले तळे बाटविले अशी त्यांनी हाकाटी केली. वीरेश्वराच्या देवळात घुसून आता तोही बाटविणार असा डोंब उठविला. त्याने भडकलेले लोक वीरेश्वर मंदिराकडे धावले. पण तेथे काय ? शुकशुकाट ! ! पुढे हे भडक अस्पृश्यपरिषदेच्या मंडपाकडे येऊन हल्ला करू लागले. मंडपात सापडलेल्यांना विना-कारण मार खावा लागला ! ! पोलिसांनी दंगलखोरांवर खटला भरला. अपराध्यांना चार-सहा महिन्यांच्या शिक्षा झाल्या.

तरीही चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने अस्पृश्यांच्या इतिहासाचे एक नवे पान लिहिले गेले. शिस्त, संयम, शांतता आणि धैर्य यांच्या जोरावर यशस्वी झालेला तो सत्याग्रह होता.

पण लक्ष्यात कोण घेतो ? चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून अस्पृश्यांना स्पृश्यांनी महाडात धारेवर धरले होते. अस्पृश्यही नेटाने तोंड देत होते. वातावरण तंग झालेले ! पण काळ पुष्कळ-वेळा अग्निशामक ठरतो. म्हणून विषय बदलून पाहण्यासाठी हाल-चाली सुरू झाल्या. पाणवठ्यासारखाच देवदर्शनाचाही हक्क खुलाच खुला पाहिजे म्हणून विचार सुरू झाले. पंढरीच्या वाळ-

वंटात सारे भक्त भजनाचे फड उभारतात, मग देवाच्या दर्शनात भेदाभेद का ?

अमरावतीच्या इंद्रभुवन थिएटरमध्ये १३ नोव्हेंबर १९२७ रोजी मोठी सभा झाली. निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत काम करणाऱ्या स्पृश्यास्पृश्य म्होरक्यांनी तेथे हजेरी लावली होती. डॉक्टर आंबेडकरांचे त्या सभेत दीडतास भाषण झाले. परिणामतः तीन महिन्यानंतरची तारीख मंदिरप्रवेशासाठी मुक्रर करण्यात आली. अमरावतीच्या श्री अंबादेवीच्या विश्वस्तांपैकी श्री. दादासाहेब खापर्डे यांनी आपली अनुमती दर्शविली. त्यानंतर पुणे वगैरे ठिकाणी सभा घेऊन मांग, चांभार, ढोर व इतरही अस्पृश्यांच्या बळकट एकीची किती निकड आहे हे स्पष्ट केले. १९२७ साल सभा, संमेलने, प्रचार व्याख्याने यांनी दुमदुमले.

या साली डॉ. आंबेडकरांनी विधिमंडळातही अंदाजपत्रकातील भोंगळपणा स्पष्ट करून दारूबंदीची आवश्यकता आणि प्राथमिक शिक्षणाची आबाळ यावर तडाखेबाज भाषण केले. लोकलबोर्डापासून मुंबई विद्यापीठ व शासनातील नोकऱ्या यामध्ये अस्पृश्याना प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे असा डॉक्टरांनी आग्रह धरला. तेव्हा महाडच्या चवदार तळ्याचे जे कवित्व रेंगाळत होते, ते मार्गी लावण्याचा निर्णय प्रथम घेण्यात आला. १२ डिसेंबर १९२७ ही तारीख निश्चित झाली. महाड नगरपालिकेने चवदार तळे सर्व जमातींना खुले असल्याचे केव्हाच जाहीर केले होते ! !

सत्याग्रही पथके महाडकडे निघाली. स्वतःच्या हक्कासाठी वाटेल ती किंमत द्यावयास सर्वांची तयारी होती. पण १२ डिसेंबर उजाडण्यापूर्वीच डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने सत्याग्रहावर बंदीहुकूम

बजावला. तो हुकूम मोडून सत्याग्रह करण्याच्या हट्टास मंडळी पेटली होती. आंबेडकरांनीच त्याना सबुरीचा सल्ला दिला. सत्याग्रहाऐवजी परिषद घेण्यात आली. हिंदूंच्या मागासलेपणावर, घाबरटपणावर आणि सरकारच्या दडपशाहीवर परिषदेने प्रखर हल्ले चढविले. अस्पृश्यांना माणुसकीतून उठविणाऱ्या ब्राह्मणेतराना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या आणि ब्राह्मणाना विशेष अधिकार देणाऱ्या मनुस्मृतीचा निषेधपूर्वक दाह २५ डिसेंबर १९२७ रोजी करण्यात आला. फार काय, या परिषदेत धर्मांतराचीही घोषणा व्हावयास चुकली नाही.

### काळाराम मंदिर– सत्याग्रह

'कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला, थांबला तो संपला।' १९३० साल हे भारताच्या इतिहासातील अन्याय्य कायदे मोडण्याचे साल. ह्या सालातील मार्च २ ही तारीख. नाशिकला 'आली सिंहस्थ पर्वणी।' तो रविवारचा दिवस. सकाळी दहा वाजताच गावाशेजारील मैदान माणसांनी फुलून गेले.

पंधरा हजार स्वयंसेवक शिस्तीने उभे होते. त्यांचे नेतृत्व नाशिकचे कर्मवीर भाऊराव गायकवाड करीत होते. जवळच्याच व्यासपीठावरून डॉ. आंबेडकर आपला एकेक शब्द तोफेच्या गोळ्याप्रमाणे फेकत होते. दुपारचे दोन वाजले. सभा संपण्यापूर्वी डॉक्टरानी भीमगर्जना केली की–'बरोबर तीन वाजता आपला मोर्चा काळाराम मंदिराकडे निघेल.'

तीन वाजता सत्याग्रही मोर्चा शिस्तीने निघाला. काळाराम मंदिर हे नाशिकचे सर्वांत प्रमुख देवस्थान. नाशिकच्या अनेकानेक

पुरोहित कुटुंबाना महार, मांग देवळात शिरणार आणि आपला देव बाटविणार ही बातमी केव्हाच केव्हाच कळली होती. म्हणून ते सत्याग्रह्यांशी मुकाबला करण्यास सज्जच होते.

काळाराम मंदिरास चार दरवाजे आहेत. त्या प्रत्येकावर हत्यारी पोलिसांचा कडक पहारा होता. सत्याग्रह्यांची मिरवणूक मुख्य दरवाजावर बाळ गंगाधर खेर प्रभृती विवेकवन्तासह येऊन डॉक्टर आंबेडकर व त्यांचे अनुयायी आत शिरणार तोच दरवाजे धाडकन् लावण्यात आले. सत्याग्रही दरवाज्यातच बसून राहिले. पुष्कळ वेळ झाल्यावर सत्याग्रहींनी घाटावर सभा घेतली. पुरोहित वर्ग व त्यांचे पाठिराखे यांच्यावर कडकडून टीकेचे हल्ले झाले.

दुसरा दिवस ३ मार्च १९३० रोजी पुन्हा मोर्चा निघाला. सत्याग्रहींनी सव्वाशे पुरुष व पंचवीस स्त्रिया यांची एकेक तुकडी पाठविण्यास सुरुवात केली. पहिली तुकडी दरवाजाजवळ धडकली. २ मार्चच्याच प्रकाराने विरोध झाला. सत्याग्रहींनी घाटावर सभा घेतली. महिनाभर असाच हा लढा चालला. मंदिर बंद ! बंद ! ! शेवटी रथोत्सव आला. तेव्हा मंदिर उघडलेच पाहिजे. तेंव्हा तडजोडीवर आले. एका बाजूला स्पृश्य व दुसऱ्या बाजूला अस्पृश्य असे राहून रथ ओढावयाचा असे ठरले. रथ पुढे आला. अस्पृश्य पुढे येताच, रथाचा दोर त्यांच्या हातात मिळण्याऐवजी त्यांना काठीमार मिळाला. त्या धांदलीत रथ पळविला गेला. नंतर काळाराममंदिर वर्षभर बंदच होते.

## राजकारणी आंबेडकर

मॉंटफोर्ड सुधारणांमुळे मताधिकार कसा अमलात आणावा यासाठी लॉर्ड साउथबरो यांच्या अध्यक्षतेखाली एक मताधिकार

समिती नेमली होती. तिच्यापुढे साक्ष देताना आंबेडकरानी ' दलितवर्गीयांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा आणि निराळे मतदार संघ मिळावेत' अशी मागणी केली होती. पण अस्पृश्यांना निराळे मतदार संघ न देता अस्पृश्यांच्या प्रतिनिधींची नेमणूक करावी असा निकाल समितीने दिला.

१९१९ चा राजकीय सुधारणा कायदा सुधारण्यासाठी २६ नोव्हेंबर १९२७ रोजी ब्रिटिश सरकारने सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. भारतात ज्या ज्या ठिकाणी कमिशन गेले त्या त्या ठिकाणी त्याचे काळ्या निशाणांनी स्वागत झाले. राजकीय दृष्ट्या, अतिशय प्रभावी असा बहिष्कार त्यावर पडला व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचा तो मानबिंदू ठरला.

सायमन कमिशनबरोबर सहकार्य करण्यासाठी केंद्र सरकारने ब्रिटिश मुलखाकरता एक समिती नेमली होती व प्रत्येक विधान सभेतून एक प्रांतिक समिती निवडण्यात आली होती. मुंबई प्रांतिक समितीवर मुंबई विधिमंडळाचे प्रतिनिधी म्हणून ३ ऑगस्ट १९२८ रोजी आंबेडकरांची निवड झाली. हिंदूपासून विभक्त अशी जमात म्हणून दलितवर्गाची नोंद व्हावी, मुंबई विधिमंडळातील १४० पैकी २२ जागा दलितांना मिळाव्यात अशा मागण्या करण्याचे डॉक्टरांनी ठरविले होते.

१९२८ मध्ये भारतात आलेल्या सायमन कमिशनपुढे साक्ष देण्यास डॉ. आंबेडकरांना पाचारण करण्यात आले. सायमन कमिशन हे फक्त ' गोरोबां 'चेच असल्यामुळे, हिंदुस्थानातील सर्व राष्ट्रीय पक्षांनी त्याच्यावर बहिष्कार घातला होता. आंबेडकरांनी त्याच्यापुढे साक्षीस जाऊ नये म्हणून सिडनहॅम कॉलेजमधील त्यांच्याच विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. पण आंबेडकरांनी १७ मे

१९२९ च्या निवेदनाने साक्ष दिली व अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.

सायमन कमिशनच्या शिफारशीप्रमाणे १९३० च्या नोव्हेंबरमध्ये १२ तारखेस गोलमेज परिषद होती. भारतातील अस्पृश्यांचे पुढारी म्हणून आंबेडकरांना त्या परिषदेचे निमंत्रण होते. या गोलमेज परिषदेला काँग्रेसचे कोणी चिटपाखरूही नव्हते. 'डेन्मार्कच्या राजपुत्रावाचून जसें हॅम्लेट नाटक', तसे ह्या गोलमेज परिषदेचे झाले. तेव्हा १९३१ च्या मे मध्ये त्यावेळचे व्हाइसरॉय आयर्विन व काँग्रेसचे म. गांधी यांच्यात सलोखा होऊन ऑगस्ट ते डिसेंबर १९३१ अखेर होणाऱ्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून गांधीजींनी भाग घ्यावयाचे ठरले.

ह्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांसुद्धा सर्व राष्ट्राचे पुढारी आपण असल्याचे गांधींनी सांगितले. डॉ. आंबेडकरांनी ते मानलेच नाही. सर्व प्रतिनिधींत अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत एकमत होऊ शकले नाही. तेव्हा त्याबाबतच नव्हे तर एकंदर जातीय प्रश्नाबद्दलचा निवाडा इंग्लंडचे मुख्यप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी द्यावा असे ठरून दुसऱ्या गोलमेज परिषदेचे सूप वाजले.

भारतीय स्वराज्याच्या भावी घटनेमध्ये दलितवर्गाच्या संरक्षणासाठी डॉ. आंबेडकर व श्रीनिवासन् यांनी काही राजकीय बंधने असलेली योजना गोलमेज परिषदेला आगाऊच देऊन ठेवली होती. अस्पृश्यांना 'अजातीय हिंदू' म्हणावे अशी त्यांची प्रमुख सूचना होती. गोलमेज परिषदेत आंबेडकरांनी ब्रिटिश राजवटीने दलितवर्गाची हेळसांड केल्याबद्दल दोषच दोष देऊन, लोकांची संमती हीच नवीन घटनेची कसोटी असली पाहिजे असे आंबेडकरांनी ठासून सांगितले होते.

१९३७ साली मुंबई प्रांतात सर कूपर मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्या मंत्रिमंडळामागे बहुमत नव्हते व ते टिकणार नव्हते याची खात्री आंबेडकरांना होती. ते काँग्रेसच्याही विरुद्ध होते. कारण १८८५ पासून १९४० पर्यंत आठ मुसलमान, दोन अँग्लो इंडियन, दोन युरोपियन, तीन पारशी आणि एकूणचाळीस हिंदू; काँग्रेसचे अध्यक्ष झाले. पण एकही अस्पृश्य काँग्रेसचा अध्यक्ष झाला नसल्याचे डॉक्टरांनी दाखवून दिले होते. १९३९ साली नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात काँग्रेस मंत्रिमंडळानी राजीनामे दिल्यावर मुस्लिम लीगचे अध्यक्ष बॅ. जिना यांनी २२ डिसेंबर १९३९ रोजी सर्व भारतभर मुक्ततादिन पाळण्याचा आदेश दिला. त्याला डॉ. आंबेडकरांनी साथ दिली ती शुद्ध राजकीय हेतूने.

१९४५ साली ब्रिटिश भारतातून आपली सत्ता काढून घेण्याच्या विचारात दिसत होते. या वाढत्या जाणिवेने आंबेडकरांना काँग्रेसशी समझौता करावा असे वाटले. कारण भारतात काँग्रेसशिवाय दुसरा कोणताही पक्ष राजकीय सत्ता हाती घेण्याइतका संघटित व समर्थ नव्हता. भारताने राजकीय समता प्राप्त करून घेतली. पण सामाजिक व आर्थिक जीवनात विषमता असल्याचे आंबेडकरांनी भारतीय घटनेचा आरंभ करताना सांगितले. लोकांनी राजकीय लोकशाहीचे रूपान्तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत लवकरात लवकर करावे यावर त्यांनी जोर दिला.

घटना समितीत आंबेडकरांचे विचार व ते प्रकट करण्याची पद्धती अत्यंत परिपूर्ण व स्पष्ट होती, घटनात्मक प्रश्नांचे त्यांचे सखोल ज्ञान, त्यावरील त्यांचे प्रभुत्व, आर्थिक प्रश्नांचाही सूक्ष्म अभ्यास आश्चर्यकारक, परिपूर्ण व असामान्य असल्याने घटनेच्या संहितीकरणाचे श्रेय शिल्पकार आंबेडकरांचेच आहे.

## गोलमेज परिषदेतून पुणे-करार

विलायतेत १९३०-३१ साली दोन गोलमेज परिषदा झाल्या. त्यात हिंदुस्थानातील अस्पृश्यांचे एकमेव पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरच होते. तेथे त्यांनी चक्क सांगितले की—

'आमची दुःखे ही वाहात राहिलेल्या जखमांसारखी आहेत. ब्रिटिश राजवट सव्वाशे वर्षे आहे तरी आमची दुःखे दूर झालेली नाहीत. असले सरकार काय कामाचे? आम्हाला असे सरकार पाहिजे की जे देशहित निष्ठापूर्वक साधेल, शिवाय न्यायाचे व निकडीचे असे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न कुणाच्याही रागा-लोभाची पर्वा न बाळगता सोडवील. भारतातील तप्त वातावरणा-मुळे बहुसंख्य लोकांना ज्या प्रकारची राज्यघटना मान्य होणार नाही, त्या प्रकारची राज्यघटना घडवून चालणार नाही...तुम्ही ठरवावे व भारतीय लोकांनी ऐकावे असा हा काळ नाही. जर राज्यघटना भारतीयांनी राबवावी असे वाटत असेल तर लोक-संमती हीच नवीन राज्यघटनेची कसोटी आहे.'

राजकीयदृष्ट्या डॉक्टरांचे भाषण इंग्रज सरकारने अरण्य-रुदनच ठरविले. पण डॉक्टरांना समाधान होईल व 'फोडा-झोडा' चे ब्रिटिश धोरण अप्रतिहत चालेल असा जातीय निवाडा इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी दिला. त्यांनी अस्पृ-श्यांना स्वतंत्र मतदार संघ दिला. ऑगस्ट १९३२ मध्ये मॅक्-डोनाल्डांचा हा जातीय निवाडा बाहेर आला. त्यावेळी म. गांधी येरवडा तुरुंगात होते. ब्रिटिशांनी आपल्या 'फोडा व झोडा' या नीतीस अनुसरले, अशी गांधींची खात्री झाली. १९०९ च्या मोर्ले मिंटो सुधारणांच्या वेळी मुसलमानांना असाच फोडण्याचा डाव

इंग्रजांनी केला होता. म्हणून त्या जातिनिवाड्याविरुद्ध १९३२ च्या सप्टेंबरमध्ये गांधींनी एकवीस दिवसांचा उपास आरंभिला.

राष्ट्रातील थोर पुढाऱ्यांनी गांधींचे प्राण वाचविण्यासाठी डॉ. आंबेडकरांची करुणा भाकली. तेव्हा त्यांच्यातील भीम भुभू:कारला की–' एकट्या गांधींच्या प्राणापेक्षा सात कोटी अस्पृश्यांचे प्राण व प्रतिष्ठा अधिक मोलाची नाहीत काय ? '

पण काही काळ लोटल्यावर आंबेडकरांतील देशभक्ताला इंग्रजांच्या कुटिल नीतीने आरंभिलेले राष्ट्रहिताचे विभाजन स्पष्ट झाले. आणि ? – डॉ. आंबेडकर सन्तासारखे द्रवले. त्यांनी येरवडा जेलमध्ये गांधींशी समझौता करून इतिहास प्रसिद्ध पुणे–करार केला व गांधींचे प्राण वाचविले २४ सप्टेंबर १९३२ रोजी.

पुणे-करारानंतर झालेल्या आंबेडकर–गांधी भेटीत आंबेडकर गांधीजींना म्हणाले–' तुमचे कित्येक अनुयायी मी अराष्ट्रीय आहे असे म्हणतात ! म्हणोत बिचारे ! पण राष्ट्रीयत्वाची कसोटी तुरुंगाच्या आड दडून राहण्यापुरती आकुंचित नाही. लढाऊ वृत्तीने, नव्हे क्षात्रतेजाने आत्मबलिदान देण्याइतकी ती बलशाली पाहिजे. गांधीजी, स्वराज्य–मागणीची ज्या ज्या वेळी संधी आली त्या त्या वेळी मी राष्ट्रीयत्वाच्या बाबतीत तुमच्याही पुढे होतो. गोलमेज परिषदेचा इतिहास ताजाच आहे. काँग्रेसला माझे जाहीर वचन आहे की, देशाला मिळणाऱ्या स्वातंत्र्यात आमचे स्थान मान्य केल्यास, देशाच्या स्वातंत्र्यासाठी तुमच्या खांद्यास खांदा लावून लढण्याला अस्पृश्य समाज तयार आहे. '

**गुणांची चाड शासनाचा पोड**

लॉर्ड लिन्‌लिथ्‌गो. हिंदुस्थानचे राजप्रतिनिधि– प्रशासक.

१९३९ मध्ये आग्र्याच्या ताजमहालाला घुमटात चीर गेली. ती लिन्लिथ्गोना कळवावयाची कोणी ? ती चीर म्हणजे वरच्या टोकापासून खालपर्यंत बारीक केसासारखा तो तडा होता. दृष्टीस पडताच शासकीय इंजिनेर टकमक पाहात राहिले, धक्काच बसला होता त्यांना.

जर का ती चीर रुंदावली तर जगातील एक सौंदर्य नाहीसे होईल. हिंदुस्थान ओके ओके दिसेल, आणि ? आणि जगभर निघेल भारतीय इंजीनियरांची अक्कल ! आठवडाभर शासकीय इंजिनीयरला झोप कोठून असणार ?

त्या चिरेची फूट (व्हाइसरॉय) लिन्लिथ्गोपर्यंत झाली ! सगळीकडे चिंतेचा काळोख पसरला. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले !

जाणत्यांची एक समिती नेमण्यात आली. देशी–परदेशी वास्तु-शास्त्रज्ञ डोके खाजवू लागले. ताजमहालचे जणू शेवटचे दर्शन घेण्यास लोकांची रांग, रीघ रोज लागू लागली. चिंता, वैताग, यांच्याशिवाय कसली भाषाच नव्हती त्या काळात !!

इतक्यात एक चमत्कार घडला. 'जे न देखे रवि। ते देखे कवि ॥' असा तो चमत्कार होता. दाढीला खुंट असलेल्या चेहऱ्याचा, फेटा बांधलेला, धोतर-कुडता पेहेरलेला एक मजूर त्या बूटइस्टाकण्यातील इंजीनियरांपुढे आला. हात जोडून तो म्हणाला– 'खाविंद, मी करू का ती चीर बंद ? देता का माझ्या कलेला संधी ?'

हतबद्ध झालेल्या इंजीनियरांना 'हो' म्हणण्याची बुद्धी झाली. तो मजूर कामाला लागला. पाच दिवसांत त्याने काय जादू केली कोणास ठाऊक ! पण ताजमहालाची ती चीर होतीची नव्हती

झाली. सगळे लोक ताजमहालाकडे व त्या मजुराकडे आदराने व आश्चर्याने पाहू लागले, वागू लागले, कौतुकाने गोडवेही गाऊ लागले. मुख्य इंजीनियर म्हणाले–

'बोल, तुला काय बक्षीस देऊ?'

मजूर उत्तरला– 'साहेब, मला या ताजमहालची कायम सेवा द्या.'

'मी काय सेवा देणार?' साहेब उत्तरले. 'मी तुझी शिफारस करतो.'

आश्वासन मिळाले. पण पुढे घोडे कोठे शिकले कोणास ठाऊक! दफ्तर-दिरंगाई म्हटली तरी तीन वर्षे? १९४२ साल उजाडले. डॉ. भीमराव आंबेडकर मजूर मंत्री व बांधकाम मंत्री म्हणून काम पाहू लागले. एके दिवशी यांच्या मेजावर एक पत्र येऊन पडले. 'वेडेवाकडे गाईन। परी तुझाच म्हणवीन।' असे ते पत्र होते.

पत्राची भाषा टूटी-फूटी हिंदी होती. त्या पत्रातील मजकूर कळताच, आंबेडकरांचे अंतःकरण कळवळले. ताजमहालच्या चिरेबंदी करणाऱ्या मजुराचें ते पत्र होते.

आंबेडकर आग्र्यास गेले. त्यांनी त्या कारागिराचा शोध घेतला. तो भेटल्यावर त्याची पाठ थोपटली. त्याला बरोबर घेऊन डॉक्टर दिल्लीस परतले.

त्या मजूर कारागिराचें नाव पूरणचंद. त्याचे नाव, कामगिरी आणि पत्र आंबेडकरांनी लॉर्ड लिन्लिथ्गोच्या कानावर घातली. विनंतीही केली की–'आजपासून पूरणचंदाची नेमणूक सरकारी इंजीनियर म्हणून करतो. मंजुरी मिळावी.'

पूरणचंदला 'साखरेचे खाणार, त्याला देव देणार' इतका आनंद झाला. पात्रतासिद्धीची पदवी नसलेल्या कारागिराची ती

नेमणूक होती. अपूर्व व लोकविलक्षणच प्रसंग तो ! पण पूरणचंदाने लोकविलक्षण कामगिरी करून तीन वर्षांपूर्वीच आपली पात्रतासिद्धी पटविली नव्हती काय ?

पुढे पूरणचंदास लॉर्डसाहेबांनी 'रायसाहेब' हा किताबही दिला. तेव्हा 'आजि पुरले नवस । धन्य काळ हा दिवस ।' असे पूरणचंदास वाटले.

## हिटलरी होरपळीत

सप्टेंबर १९३९ च्या प्रारंभीच जर्मनीने पोलंडवर हल्ला केला. त्याबरोबर इंग्लंडने ३ सप्टेंबर रोजी जर्मनीबरोबर युद्ध पुकारले. भारतही युद्धात गोवला गेला. पण स्वाभिमानी भारत परतंत्र अवस्थेत लोकशाहीसाठी लढणे अशक्य होते. म्हणून ब्रिटिश सरकारशी असहकार करण्यासाठी देशभरीच्या काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले व राज्यपालांचा अंमल सुरू झाला. तेव्हा युद्धात भारतीय जनतेचे सहकार्य मिळण्यासाठी ब्रिटिश सरकारने निरनिराळ्या योजना पुढे आणल्या.

ऑगस्ट ऑफर म्हणून ८ ऑगस्ट १९४० रोजी व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथ्‌गो यांनी एक घोषणा केली. जगातील जुलूम आणि आक्रमण यांच्या विरुद्ध झगडा देण्यासाठी भारतीय जनतेला जास्तीत जास्त कामगिरी करता यावी यासाठी, युद्धोत्तर भारताला वसाहतीचा दर्जा देऊन ब्रिटिश राष्ट्रकुलात समान व स्वतंत्र भागीदारी करणे हा त्या घोषणेचा उद्देश होता. सावरकरांप्रमाणेच आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील शेतकरी कामकरी फेडरेशनने ही

योजना स्वीकारण्याची तयारी दाखविली. पण काँग्रेसने त्या योजनेस विरोध केला.

**क्रिप्स योजना** म्हणजे ब्रिटिनच्या युद्धकालीन मंत्रिमंडळातील एक मंत्री क्रिप्स २२ मार्च १९४२ रोजी भारतात येऊन त्यांनी आणलेले एक योजनेचे पुडके होते. युद्ध संपताच घटना समिती बोलावणे, त्यावेळच्या हिंदी संस्थानिकांच्या सहकार्याने घटनेचा मसुदा तयार करणे आणि तसे करताना भारतीय संघराज्यात येणे, न येणे, हे प्रांताप्रांताच्या मर्जीवर सोपविणे इत्यादी त्या योजनेची कलमे असून घटना समितीने ब्रिटिश सरकारशी एक करार करावयाचा होता.

क्रिप्स योजनेला म. गांधीसह सर्वांनी विरोध केलाच होता. ३० मार्च रोजी एम्. सी. राजासह डॉ. आंबेडकरांनी क्रिप्सशी वाटाघाटी केल्या आणि सांगितले की– 'या योजनेमुळे दलित वर्गीयांना जास्तीत जास्त नुकसान भोगावे लागणार आहे.' दलित वर्गीयांच्याबाबत काही आवश्यक संरक्षक बंधने क्रिप्स योजनेत नसल्यामुळे आंबेडकरांनी ती योजना धिक्कारली. १९४२ च्या जुलै महिन्यात दलित वर्गाची परिषद घेऊन 'आमच्याजवळ जी जी साधने असतील त्यांचा वापर करून आपल्यावर जी आपत्ती येईल तिचा प्रतिकार करण्याचा आम्ही निश्चय केला आहे.' अशा शब्दांत दलितवर्गाने प्रतिक्रिया व्यक्त केली.

**राजाजी योजना** मग पुढे आली ती भारतातील घटनात्मक पेच प्रसंग सोडविण्यासाठी. मुस्लिम लीगचा भारतातून फुटून निघण्याचा हक्क काँग्रेसने मान्य करावा आणि निश्चित राजकीय योजना तयार करण्यासाठी व देशातील आणीबाणीत राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी मुस्लिम लीगशी वाटाघाटी सुरू कराव्यात.

काँग्रेसने राजाजींना व त्यांच्या योजनेला धुडकावून लावले व डॉ. आंबेडकर प्रभृतींनी दखलही घेतली नाही.

मग १९४४ च्या नोव्हेंबरात दिल्लीत अपक्षीय अशी परिषद भरली. त्या परिषदेच्या अपेक्षेप्रमाणे ३ डिसेंबर १९४४ रोजी सर तेजबहादूर सप्रू यांनी सलोखा स्थापन करण्यासाठी सर्वमान्य अशी समिती स्थापन करण्याची घोषणा केली. या सप्रू समितीला पाठिंबा देण्याचे आंबेडकरांचे मनात आले पण सप्रूशिवाय समितीचे इतर सभासद लोकांत विश्वास उत्पन्न करू शकत नव्हते अशी आंबेडकरांची तक्रार होती.

त्यापुढे १४ जून १९४५ रोजी व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यानी एक योजना जाहीर केली. भारतीय पुढाऱ्यांनी सिमला येथे एक परिषद भरवावी आणि नवीन करण्यात येणारे कार्यकारी मंडळी-संबधी परिषदेचा सल्ला घ्यावा, असा त्यांचा रोख होता. व्हाइस-रॉयांच्या नवीन कार्यकारी मंडळात हिंदू आणि मुसलमान यांचे सारखे प्रतिनिधी घेतले जाणार अशी त्यांची योजना होती. या वेव्हेल योजनेप्रमाणे लवकरात लवकर घटना समिती बोला-वण्याचा सरकारचा उद्देश होता. भारतातील प्रमुख पक्षांच्या पाठिंब्याने बनलेले कार्यकारी मंडळ अस्तित्वात आणण्यासाठी ब्रिटिश सरकारने व्हाइसरॉयला संपूर्ण अधिकार दिले होते. मार्च १९४५ मध्ये लॉर्ड वेव्हेल लंडनला चर्चेसाठी गेले होते. भुलाभाई देसाई व लियाकतअली खान दोघांच्या करारास अनुसरून भारता-तील परिस्थितीवर तोडगा काढावा हा त्या चर्चेमागील उद्देश होता. या कराराला सप्रू समितीने पाठिंबा दिल्यामुळे, लॉर्ड वेव्हेल भारतात परत आले ते एक योजना घेऊनच. कारागृहात असलेले काँग्रेस पुढारी सुटले व २५ जून १९४५ रोजी सिमल्याला एक

परिषद झाली.

डॉ. आंबेडकर यावेळी व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद असल्याने त्यांना या परिषदेत भाग घेता आला नव्हता.

ऑगस्ट १९४५ मध्ये हिटलरी होरपळ (म्हणजे दुसरे जागतिक युद्ध) संपल्यावर, ब्रिटनमध्ये नवीन निवडणुका होऊन मजूर पक्ष अधिकारावर आला. भारताचा प्रश्न सोडविण्यासाठी ब्रिटिश मंत्रिमंडळातील क्रिप्स, अलेक्झांडर व लॉरेन्स हे तीन मंत्री भारतील पुढाऱ्यांशी घटनात्मक चर्चा करून पेचप्रसंग सोडविण्यासाठी भारतात आले ते २४ मार्च १९४६ रोजी. भारतातील पुढाऱ्यांशी बोलणी झाली पण काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात भारतीय घटनेबाबत त्यांना एकवाक्यता निर्माण करणे अवश्य होते. पण त्या कामी त्यांना अपयश आले व १२ मे १९४६ रोजी सर्व चर्चेचा बोजवारा उडाला. त्रिमंत्र्यांचे निवेदन १६ मे १९४६ ला प्रसिद्ध झाले. त्यावर आंबेडकरांची प्रतिक्रिया फारच तिखट होती. मध्यवर्ती विधि मंडळात अस्पृश्यांना स्वतःचे प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार नव्हता, निश्चित प्रतिनिधी किती हेही कळत नव्हते; घटना समितीत प्रतिनिधित्व करण्याचा हक्कही अस्पृश्याना नव्हता. मग आंबेडकर का खवळू नयेत? १९४६ च्या ऑगस्टमध्ये आंबेडकर आणि व्ही. शिवराज लंडनला गेले आणि त्यांनी ब्रिटिश सरकारने अनुसूचित जातींना दिलेली वचने त्रिमंत्र्यानी कशी पायदळी तुडविली याबाबत पंतप्रधान ॲटलींना निवेदन केले.

त्रिमंत्रि योजनेच्या सहकार्याने व्हाइसरॉयानी अंतरिम सरकारसाठी एक चौदा जणांचे कार्यकारी मंडळ तयार केले.

पुढे घटना समितीची निर्मिती झाली. डॉ. आंबेडकर बंगाल विधि समितीतून तिच्यावर निवडून आले. घटना समितीच्या मसुदा

समितीवर प्रथम सभासद व नंतर अध्यक्ष म्हणूनही त्यांची निवड झाली. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीची पहिली बैठक झाली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र होताच, ' भारताची सार्वभौम घटना समिती ' असे नाव तिला मिळाले. ४ नोव्हेंबर १९४८ ला घटनेचा पहिला मसुदा घटना समितीला सादर करण्यात आला आणि २६ नोव्हेंबर १९४९ ला घटनेचा अखेरचा मसुदा संमत झाला.

याच कालावधीत १९४२ च्या जुलैत व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात कामगार खात्याचे प्रमुख म्हणून डॉ. आंबेडकरांची नियुक्ती झाली होती. जुलै १९४६ पर्यंत ते त्या पदावर होते. सप्टेंबर, १९४६ मध्ये अस्पृश्यांच्या हितरक्षणाच्या दृष्टीने आंबेडकर इंग्लंडला गेले होते. घटनात्मक तरतुदी करून घेतल्या तरच त्रिमंत्रि शिष्टमंडळाने अस्पृश्यांवर केलेल्या अन्यायाचे परिमार्जन होईल, अशी त्यांची धारणा होती. पुढे घटना समितीतील अपूर्व कामगिरीत गुंतले असताही, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्याबरोबर, स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळातील कायदेमंत्री म्हणून आंबेडकरांचा शपथविधी झाला.

## घटना परिषदेत

' आज आपण राजकीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुभंगलेलो आहोत. आपण विरोधी छावण्या करून आहोत, तरी माझी खात्री आहे की परिस्थिती आणि काळ येताच आपल्या एकीस कोणतीही गोष्ट अडथळा करू शकणार नाही. जरी जाती, पंथ, एक असले तरी आपण अनेक राष्ट्रे होऊ याविषयी माझ्या मनात संदेह नाही. जरी मुस्लिम लीग हिंदुस्थानच्या फाळणीसाठी

चळवळत असली तरी एखाद्या दिवशी त्यांच्या मनावर प्रकाश पडेल व अखंड हिंदुस्थान सर्वांसाठी हितकर आहेसे त्यांना वाटावयास लागेल, असे म्हणावयास मला संदेह वाटत नाही.

फौजदारी कायद्याबाबत आपल्याकडे एकसारखी संहिता निर्माण झाली आहे. तसेच मिळकतीचा हक्कपालटाचा कायदा, निगोशिएबल् इन्स्ट्रुमेंट्स अॅक्ट असेही कायदे निर्माण झाले आहेत. यावरून प्रत्यक्षात मुलकी कायद्याची संहिताच निर्माण झाली आहे. समान नागरिक संहिता निर्माण करताना, विद्यमान कायद्यामध्ये हिंदू कोड चार नवीन गोष्टींची भर घालील. जन्माने मिळणाऱ्या अधिकारांचे तत्त्व नाहीसे करणे, स्त्रियांना मालमत्तेचा निरंकुश अधिकार, मुलीला संपत्तीत वाटा व घटस्फोटाची तरतूद.'

घटना ही गतिमान असा लेख आहे. लोकांच्या बदलत्या परिस्थितीत बदलत्या गरजा लक्षात घेऊन वर्धिष्णू राष्ट्राच्या आकांक्षा पुऱ्या करणे हे घटनेचे कार्य असते. या दृष्टिकोनातून आंबेडकरांनी घटनादुरुस्तीची आवश्यकता प्रतिपादन केली होती.

कार्यक्षम अशा शासक वर्गाशिवाय कोणत्याही सरकारला धोरणाचे सातत्य टिकवून धरणे अशक्य असते. म्हणून अखिल भारतीय स्वरूपाच्या शासक वर्गासंबंधीची केलेली तरतूद हे घटनेचे एक खास वैशिष्टच म्हणून सांगता येईल.

संघराज्य स्वरूपाच्या घटनेचा अविभाज्य भाग म्हणून सर्वोच्च न्यायालय असते; घटकराज्ये व केंद्रसरकार यांतील वादात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अखेरचा मानला जातो. तसेच घटनेचा अर्थ लावणे हे अत्यंत महत्त्वाचे काम न्यायालयाला करावे

लागते व ते अखेरचे म्हणून मानले जाते.

सामुदायिक जबाबदारी हा मंत्रिमंडळाच्या पद्धतीचा आत्माच असतो. मंत्रिमंडळाचा आधारस्तंभ पंतप्रधानच असतो. भारतीय घटनेत हे तत्त्व पूर्णपणे समाविष्ट असल्याचा निर्वाळा आंबेडकरांनी दिला होता.

भारतीय संघराज्याच्या अग्रस्थानी कार्यकारी म्हणून भारताचा राष्ट्राध्यक्ष असतो.

सरकारने ग्रामपंचायती संघटित करण्याचा प्रयत्न करावा आणि त्याला इतके अधिकार द्यावेत की सरकारचा घटक व पाया म्हणून काम करण्यास त्या सिद्ध होतील. के. संथानम् यांची ही सूचना आंबेडकरांनी स्वीकारली.

निःसंशय भारताची सार्वभौम सत्ता भारतीय जनतेतून निर्माण झाली आहे.

## लोकशिक्षण

'जे जे काही आपणासी ठावे। ते ते दुसऱ्याशी शिकवावे। शहाणे करून सोडावे। सकळ जन॥' म्हणून जनजागरासाठी वृत्तपत्रांचा उपयोग होतो. सामाजिक व राजकीय अन्यायांविरुद्ध लढण्यास जनता सिद्ध करण्यास वृत्तपत्रांचा फार उपयोग होतो. डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' व 'समता' या वृत्तपत्रांतून आपले स्पष्टोक्तिपूर्ण लेख लिहिले. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात सर्व आघाड्याच खळबळजनक होत्या. त्यात दलितवर्गीयांच्या प्रश्नाबाबत जागृती घडवून आणणे, त्यांचे घटनात्मक प्रश्न त्यांना समजावून देणे आणि त्या अनुरोधाने समाजाला क्रियाशील करणे आपले अपरिहार्य कर्तव्य मानून

आंबेडकरांनी निष्ठेने लोकशिक्षण केले. जनता व प्रबुद्ध भारतात तर त्यांनी स्पष्टच संदेश दिला की–' लढा, अधिक जोमाने लढा; त्यागाच्या मार्गानेच दलितवर्गीयांना उज्ज्वल भविष्य लाभेल. राज्य करणारा वंश होणे हे आपले ध्येय आहे. वाघासारखे शूर व्हा. ' सामाजिक क्रांतीची तीव्र इच्छा त्यांच्या लिखाणातून प्रत्ययाला येई. टीकाकारांना व शत्रूंना ते चितपटच करीत.

प्रौढांच्या अशा जाहीर शिक्षणापेक्षाही उमलत्या पिढीच्या संस्कारयुक्त शिक्षणाबद्दल आंबेडकरांना अधिक आस्था होती. नव्या दमाची मंडळी ज्ञानी हवीत. आधुनिक भारतातील श्रेष्ठ राष्ट्रीय पुढारी, समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि संशोधक यांनी शिक्षणाबाबत जागरूकतेने काम केले आहे. लो. टिळक, ना. गोखले, न्या. रानडे, लाला लजपतराय, आशुतोष मुखर्जी, रवींद्रनाथ टागोर, अशी ख्यातनाम मंडळी सहज सांगता येतात. त्याच मालिकेत डॉ आंबेडकरांचे नाव आहे. २० जून १९४६ रोजी आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीतर्फे मुंबईला सिद्धार्थ (महात्मा बुद्ध) महाविद्यालय स्थापन केले. सत्याचा शोध घेणे व मानवता शिकवील अशी धर्माची शिकवण आचरणात आणणे हे ध्येय त्यांनी ठेविले.

मुलामुलींना समान शिक्षण द्यावे हे आंबेडकरांना मान्य नव्हते. मॅट्रिक परीक्षेच्या पुढे मुली गृहशिक्षणात तरबेज असाव्यात यावर त्यांचा कटाक्ष असे.

आंबेडकरांच्या मते प्राध्यापक नुसता पढिक विद्वान् होऊन भागत नाही. त्याने स्पष्ट आवाजात बोलले पाहिजे व तो सर्व दृष्टींनी अभ्यासू असला पाहिजे. विद्यार्थ्यांतील सुप्त गुण वाढीस लावील तोच खरा शिक्षक.

विद्यार्थ्यांनी राजकारणात प्रत्यक्ष भाग घेऊ नये; पण काही नवीन जीवनमूल्ये आत्मसात करावीत व प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्नशील असावे. स्वावलंबनाचे आणि स्वसंस्कृति-वर्धनाचे महत्त्व आंबेडकरांनी आपल्या विद्यार्थ्यांवर बिंबवण्याचा प्रयत्न आपल्या सिडनहॅम कॉलेजमधील प्राध्यापकीय कारकीर्दीत केला. १९५२ च्या डिसेंबरमध्ये एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या संमेलन प्रसंगी आंबेडकरांनी 'बदलत्या काळाच्या गरजेप्रमाणे विद्यापीठीय शिक्षणाची पुनर्घटना करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व विद्यापीठ हे ज्ञानमंदिरच असावे' असे प्रतिपादिले. रानडे, गोखले, टिळक यांची उज्ज्वल परंपरा, अखंड परिश्रम, उच्च ध्येय आणि सार्वजनिक जीवनाविषयीची उच्च जाणीव यांची त्यांनी विद्यार्थ्यांना आठवण करून दिली.

## ग्रंथकार आंबेडकर

मनुष्याच्या चरित्र चारित्र्याइतकेच त्याचे विवेकधन हे लोकशिक्षण पुढील पिढीतही साधत राहते. विवेकधन पुढील पिढीला वारसा म्हणून ठेवण्याचे आणि पुढील पिढीने अभ्यासपूर्वक आत्मसात करण्याचे साधन कोणाही विवेकवंताने लिहिलेला ग्रंथ होय. डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचारधारा ग्रंथनिर्मितीनेही अमर केल्या असून, त्यात त्यांचा गाढा व्यासंग, सूक्ष्म व चिकित्सक दृष्टिकोन, वाचकास बिनचूक व अचूकपणे शहाणे करून सोडण्याची तळमळ त्यांच्या वाक्यावाक्यागणिक प्रत्ययाला येतात. त्यांची मते निर्विवादपणे कोणी मान्य करीलच करील, असे नसले तरी डॉक्टरांची प्रेरणा आणि त्या प्रेरणेप्रमाणे आविष्कृत झालेली त्यांची मते शुचिर्भूत प्रामाणिकपणाचीच आहेत; याबद्दल मात्र वाचक

निःशंक असतो. पीएच. डी. साठी त्यांनी लिहिलेले प्रबंध, अर्थ शास्त्रीय चलनादिक विषयांवर त्यांनी लिहिलेले व जागतिक विद्वानांच्या आदरास पात्र झालेले त्यांचे ग्रंथ जितके विचार प्रवर्तन करून बसले, तितकेच त्यांनी भारतीय जीवनौघातील ज्वलंत समस्यावर लिहिलेले ग्रंथ ही विचारप्रवर्तन करण्यास चुकले नाहीत. आपल्या काळच्या ज्वलंत समस्यावर डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले ग्रंथ असे–

शूद्र कोण ? (*Who were the Shudras ?*)
अस्पृश्य (*Untouchables*)
भारतातील जाती (*The Castes in India*)
जातिनिर्मूलन (*The assimilation of Castes*)
काँग्रेस आणि गांधी (*Congress and Gandhi*)
रानडे, गांधी व जीना (*Ranade, Gandhi and Jinha*)
पाकिस्तान विचार (*Thoughts an Pakistan*)
गायकवाडाना पत्रे
बुद्ध व त्याच्या धर्माचे भवितव्य
बुद्ध आणि त्याचा धम्म
प्रदेश आणि अल्पसंख्य (*States and Minorities*)
बौद्ध धर्म व समाजसत्तावाद (*Buddhism and Communism*)
पाकिस्तान की भारताचे विभाजन (*Pakistan or Partition of India*)
फेडरेशन व्हर्सस फ्रीडम
भाषिक प्रांतासंबंधी विचार (*Thoughts on Linguistic States*)

या ग्रंथांशिवाय ज्वलंत प्रश्नावर डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले मासिका मासिकांतील लेख, सामनेवाल्यास त्यांनी खरपूस दिलेली

उत्तरे किंवा प्रसंगोपात व्याख्यानांच्या द्वारा ज्वलंत समस्यांचा त्यांनी जो समाचार घेतला, त्याचा वृत्तपत्रांतून प्रगट झालेला आविष्कार, व विधिमंडळातून व परिषदा-परिषदांच्या अहवालातून त्यांची प्रसिद्ध झालेली टणक प्रतिपादने हे सर्व वाङ्मय पद्धतशीर संपादकीय संस्कार होऊन ग्रंथरूपानें बाहेर पडेल, तर तेही डॉ. आंबेडकरांच्या सारख्या 'अभ्यासेचि प्रगट' होणाऱ्या विद्वानाच्या स्मारकाचे अभिनव शिल्प ठरू शकेल.

डॉ. आंबेडकरांच्या समग्र ग्रंथरचनेचा विचार करता, त्यांचे बरेच ते वांङमय इंग्रजी माध्यमाने प्रसिद्ध झाले आहे, याचे पुष्कळांना आश्चर्य वाटेल. पण भारतातील ज्वलंत समस्या सोडविताना जागतिक मानव्यावर त्यांचा परिणाम होण्याइतक्या त्या गंभीर असल्याकारणाने, त्यांची उमज भारतीय विवेकावन्तांप्रमाणेच जागतिक विवेकवंतानाही व्हावी आणि आज-उद्याच्या विचारमंथनातून परवा का होईना, निदान वैचारिक बन्धुभाव, आणि तोही नसला तर शक्य तेवढा वैचारिक सहकार समन्वय सर्वच मानवांमध्ये शक्य व्हावा, असा डॉक्टरांच्या लेखनामागील प्रेरणेचा वेधबिंदू होता असे दिसते. 'व्यापकपण सोडू नये काही केल्या' हाच विवेक आपल्या बहुतेक सर्व ग्रंथोत्पत्तीमध्ये इंग्रजी माध्यम वापरण्यात डॉक्टरांच्या मनी प्रबळतम झाला असला, तर त्यांच्या प्रखर विद्वत्तेच्या झेपेस ते साजेसेच नाही काय ?

## आंबेडकर झाले बुद्ध, भारत प्रबुद्ध

बालपणापासून आंबेडकरांना बौद्ध धर्माबद्दल आकर्षण होते. गौतमबुद्धाला ते द्रष्टा धर्मोपदेशक समजत. बौद्ध धर्मात प्रत्येक माणसाच्या जिवंत अनुभवाची अपेक्षा असते; बौद्ध धर्म स्वातंत्र्य,

समता, सत्य व न्याय यांना उचलून धरतो. तो मानवावर प्रेम आणि शांतता यांचा वर्षाव करतो. तो गतिमान व सर्व समावेशक आहे. म्हणून बौद्ध धर्मच स्वीकारावयाचा असे डॉ. आंबेडकरांनी सुचविले. पुणे, वरळी (मुंबई) रंगून, देहूरोड, लंडन (बी. बी. सी.) येथील व्याख्यानांतून.)

२३ सप्टेंबर १९५६ रोजी आंबेडकरांनी आपण नागपूर येथे १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत बौद्ध धर्माचा स्वीकार करणार असल्याचे प्रगट केले. बौद्ध नाग प्राचीन काळीं नागपूर भागात उदयाला येऊन त्यांनी राज्ये स्थापिलीं होती. या ऐतिहासिक सत्याची आठवण म्हणून डॉ. आंबेडकरांनी बुद्ध धर्माची दीक्षा घेण्यास नागपूर निवडले.

१३ ऑक्टोबरला पत्रकार परिषदेत आपल्या धर्मांतराबद्दल निवेदन केले. 'बुध्दं शरणं गच्छामि' म्हणजे मी ज्ञान्याला शरण आहे, 'संघं शरणं गच्छामि।' म्हणजे मी सामाजिक जीवनाला शरण आहे,' अशी बुद्ध धर्माची शिकवण असल्याकारणाने मी माझ्या समाजासह बुद्ध होत आहे' असे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

१४ ऑक्टोबर १९५६ ला नागपुरात दीक्षा समारंभ झाला. सर्व विधी पार पडल्यावर आंबेडकर म्हणाले, 'विषमता व जुलुमशाहीवर आधारलेल्या धर्माचा त्याग करून आता माझा पुनर्जन्म झाला आहे.

आंबेडकरांनी अस्पृश्यांचे सामुदायिक धर्मांतर घडवून आणले. ती भारतात अभूतपूर्व चळवळ होती. त्यांनी बुद्धिनिष्ठ पद्धतीही अमलात आणली. धार्मिक ढोंगीपणा आणि अप्रामाणिकपणा यांच्याविरुद्ध सामाजिक जाणीव निर्माण करणे हीच या धर्मांतरामागची प्रेरणा होती. डॉक्टरांचा दृष्टिकोण मानवव्यापक होता.

१९४९ मध्ये त्यांनी खाटमांडू (नेपाळ) येथे भरलेल्या जागतिक बौद्ध परिषदेत मार्क्सवादा (समाजसत्तावादा) ला पर्याय म्हणून बौद्ध धर्मच होऊ शकतो असे प्रतिपादन केलेच होते. एवढेच नव्हे, तर १९५१ मध्ये त्यांनी भारतीय बौद्ध जनसंघ स्थापन केला होता. व बौद्ध उपासना पाठही तयार केला होताच. १९५४ मध्ये रंगून येथे भरलेल्या जागतिक बौद्ध परिषदेत ते प्रतिनिधी म्हणून हजर होते. १९५५ मध्ये त्यांनी भारतीय बौद्ध महासभा स्थापन केली होती. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा अंगीकार केल्यानंतर खाटमांडू येथे भरलेल्या जागतिक बौद्ध परिषदेस गेले असता, नवबौद्ध म्हणून त्यांचा गौरव झाला.

**निर्वाण**

१९५६ च्या ६ डिसेंबर रोजी डॉ. आंबेडकरांचे महानिर्वाण झाले. एक झुंजार व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. लक्षावधी लोक दुःखसागरात लोटले गेले. पण डॉ. आंबेडकरांच्या चरित्र चारित्र्यांचे स्मरण होऊन होऊन, समाजात नवनवी स्फूर्ती होत राहिली.

राष्ट्रपतींपासून सामान्य जनापर्यंत सर्वांनी आंबेडकरांचे अलौकिकत्व ओळखले होते. हिंदू समाजातील जुलमाविरुद्ध लढणाऱ्या बंडखोरीचे प्रतीक असे पं. जवाहरलाल नेहरू यांनी संबोधून दलितांचा कैवारी अशी श्रद्धांजली वाहिली. सामाजिक अन्यायाचे निवारक व पद-दलितांचे कैवारी लढवय्ये म्हणजे डॉ. आंबेडकर.

— हरिभाऊ पाटसकर

दलित वर्गाच्या हक्कांचा खंबीर पुरस्कर्ता

— रँग्लर परांजपे

आंबेडकरासारखा अष्टपैलू विद्वान. विसाव्या शतकातील पन्नास वर्षांचा इतिहास त्यांच्या चरित्राभोवती गुंफलेला दिसेल. ते जरी मोठ्या पदाला पोचले तरी सामान्य जनांशी त्यांचा संबंध सुटलेला नव्हता.

—टाइम्स, मुंबई (७–१२–५६)

डॉ. आंबेडकर हे विसरले जाण्यासारखे गृहस्थ नाहीत.

—म. गांधी (यंग इंडिया ११–७–३६)

पांडवातील भीमाप्रमाणे आंबेडकरांचे काम असून त्यांच्या भीम नावाला साजेसे काम करून ते सार्थनामा झाले आहेत. भाषा, विचार व दृष्टिकोन यांच्या स्पष्टतेमुळे त्यांचे काम उज्ज्वल झाले आहे.

— आर. व्ही. धुळेकर

डॉ. आंबेडकरांनी आपल्या अंगावर विशाल, भव्य, व प्रचंड कार्य घेतले व त्याकरिता वाफेच्या रुळासारखी स्वतःची बुद्धिमत्ता वापरली. त्यांना जे योग्य व न्याय्य ठरले, त्याच्या बाजूने ते उभे राहिले.

— डॉ. पट्टाभी सीतारामय्या

डॉ. आंबेडकरांची अंत्ययात्रा मुंबईच्या इतिहासात मोठी होती. त्यांनी ज्याला स्पर्श केला, त्याला त्यांनी भूषविले, अशीच सर्व जनतेची कृतज्ञतांजली होती.

### डॉ. आंबेडकर दर्शन

डॉ. आंबेडकर हे नुसते पढिक पंडित नव्हते. ते बुद्धिमान होते, समाजाला काय पाहिजे हे त्यांनी ओळखले आणि गरिबांत गरीब अशा जनतेच्या उद्धारासाठी आणि त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. परंपरा, धर्म, आंधळी पुराण-

स्त्रियता यांच्या शृंखला त्यांनी तोडल्या. सामाजिक समता प्रस्थापित करणे हीच आंबेडकरांच्या सामाजिक लढ्यामागील प्रेरणा होती. आंबेडकरांचे पुढारीपण गतिशील होते. एका साध्या जमादाराचा मुलगा स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात बसला व स्वतंत्र भारताच्या घटनेचा शिल्पकार झाला. डॉ. आंबेडकर सामाजिक, राजकीय कार्यात कळकळीने भाग घेत असले तरी मानसिक दृष्टीने अलिप्त होते; निष्काम कर्मयोगी होते. दिनशा वाच्छा यांनी आपल्या पुस्तकात डॉ. आंबेडकरांच्या चौरस विद्वत्तेबद्दल आणि अनुपम ग्रंथसंग्रहाबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. कारण आंबेडकर ज्ञानव्यसनीच होते. स्वाभिमानाचे ज्वालामुखी होते ते. अर्थशास्त्राचे गाढे व्यासंगी असल्याकारणाने त्यांनी आपल्या अर्थविषयक मतांना नैतिक अधिष्ठान दिले होते. सामान्यजनात न्याय्य रीतीने संपत्तीची विभागणी करणे हा हेतू त्यांच्या विचारामागे होता.

चाळीस वर्षांच्या सार्वजनिक जीवनात आंबेडकर 'चढती वाढती पदवी' पावले. १९१८ ते १९२८ या काळात कायदेपंडित म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. मानवी प्रतिष्ठा, सचोटी, समता, स्वातंत्र्य, नागरी हक्क आणि अस्पृश्यांसाठी नागरी सवलती यांची जरूरी त्यांनी सातत्याने प्रतिपादन केली. १९३६ पर्यंतच्या नऊ वर्षात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळावा म्हणून त्यांनी घटनात्मक लढा दिला. गोलमेज परिषदा, पुणे करार, येवले येथे धर्मांतराची घोषणा व स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना ही प्रगतीची पथदर्शके याच कालखंडातील होत. १९४६ पर्यंतच्या पुढील दहा वर्षात मुंबई विधिमंडळातील विरोधी पक्षाचे नेते, व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद आणि भारतीय राजकारणातील

पेचप्रसंग सोडविण्याच्या योजनांचे चिकित्सक म्हणून आंबेडकरांनी बजावलेली कामगिरी चिरस्मरणीय आहे. आणि १९५६ पर्यंतच्या दहा वर्षांत तर घटना-समितीमध्ये कालपरिपक्व स्मृतिकार म्हणून त्यांनी केलेली अमर कामगिरी शिरोधार्य असून, त्यांनी केलेल्या धर्मांतराने सर्व भारतच खळबळवून सोडला होता. धार्मिक जागृती व सामाजिक सुधारणा या आंबेडकरांच्या विचारधारेचे कस होते.

**आंबेडकरांची प्रबोधने**

१. माझा आदर्श समाज स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यावर आधारलेला असेल.

२. जगात नित्य, शाश्वत, सनातन असे काही नाही; प्रत्येक वस्तुजात ही नित्य बदलत असते.

३. शिक्षण घ्या, चळवळ करा, संघटित व्हा आणि आत्मविश्वास वाढवा.

४. धर्माचा पाया व्यक्तिजीवनाला आवश्यक आणि सामाजिक व्यवहाराला पोषक असा आहे. धर्म माणसात आशावाद निर्माण करतो आणि त्याला कार्याला प्रवृत्त करतो.

५. कायद्यापुढे सर्व नागरिक समान असतात आणि त्यांना समान नागरी अधिकार असतात.

६. पददलित जनतेच्या उद्धारासाठी त्यांची सेवा करीत असताना मरण पत्करणे ही माझी गंभीर प्रतिज्ञा आहे.

७. सार्वजनिक जीवनात आपण अशी परंपरा निर्माण केली पाहिजे की ज्यामुळे आपल्या वैयक्तिक आचरणाबद्दल कोणी शंका घेणार नाही.

८. आम्हाला शांतता पाहिजे. कोणालाही युद्ध नको. प्रश्न

असा आहे की शांतता आपण किती किमतीला खरेदी करीत आहोत ?

९. "मी महाराष्ट्रीय आहे' यापेक्षा 'मी भारतीय आहे, मी आशियायी आहे किंवा मी जगाचा सुसंस्कृत नागरिक आहे.' अशा उदात्त आणि व्यापक कल्पना आपण वाढविल्या पाहिजेत.

१०. व्यष्टी व समष्टी या दोघांच्या दृष्टीने संसदीय लोकशाही-ह्या उत्कृष्ट राज्य प्रकार.

११. आदर्श समाज गतिमान असावा. एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे जाण्यासाठी मार्गांची उपलब्धता त्यात असावी.

१२. भारताच्या इतिहासात (न्यायमूर्ती माधव गोविंद) रानडे यांच्यासारखा ज्ञानाचा विस्तार, सखोल अभ्यास, विशाल दृष्टि-कोन असलेला माणूस सापडणे कठीणच जाईल. त्यांचे वाचन प्रचंड प्रमाणात होते आणि त्यांचा कण न् कण पांडित्यपूर्ण होता. त्यांच्या काळातील मानदंडाप्रमाणे पाहिले तरी ते श्रेष्ठ होते.

१३. सचोटी आणि बुद्धिमत्ता यांचा संग झाल्याशिवाय कोणाही माणसाला मोठे होता येणार नाही.

१४. लाला (लजपतराय) जी प्रामाणिक, निःस्वार्थी आणि हाती घेतलेल्या कामासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध होते. त्यांनी सामाजिक सुधारणा आणि राजकारण यांची फारकत केली नाही.

१५. गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा, म्हणजे तो बंड करून उठेल.

इंद्रायणी साहित्य
पुणें

मूल्य रूपये तीन